आज़ादी का अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुवर्णपाने



संपादक
प्रो.डॉ. वासुदेव वले
कार्यकारी संपादक
प्रो.डॉ. जे. व्ही. पाटील ▪ प्रो.डॉ. जे. डी. गोपाळ

प्राईम®
पब्लिशिंग हाऊस

प्राईम
पब्लिशिंग हाऊस

© सुरक्षित

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुवर्णपाने**

संपादक - प्रो.डॉ.वासुदेव वले

कार्यकारी संपादक - प्रो.डॉ.जे.व्ही. पाटील, प्रो.डॉ.जे.डी. गोपाळ

प्रकाशक
प्रदीप पाटील
प्राईम पब्लिशिंग हाऊस
३, प्रताप नगर, ज्ञानेश्वर मंदिर रोड,
जळगाव ४२५००१.
दूरध्वनी : ०२५७-२२३५५२०, २२३२८००, ८९९९२३४५५६
Email : primepublishinghouse@gmail.com

शाखा : कोल्हापूर । पुणे । नाशिक

ISBN 978-93-95596-19-0

पहिली आवृत्ती : डिसेंबर २०२२
मुद्रण : आविष्कार ग्राफिक्स
अक्षरजुळवणी : प्राईम टिम

मूल्य : ₹ ३२५/-

अर्थसहाय्य : विद्यार्थी विकास विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

*या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी संपादक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. या पुस्तकात मांडण्यात आलेली मते आणि दृष्टिकोन लेखकांचे स्वतःचे आहेत. लेखकांच्या मताशी विद्यापीठ प्रशासन, प्रकाशक, संपादक व कार्यकारी संपादक हे सहमत असतीलच असे नाही.*

## अनुक्रमणिका


१. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील नाशिक जिल्ह्यातील निवडक स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान ................................ ११
श्री. भरत केवळ आहेर, प्रा. डॉ. संजय यशवंत गवळी

२. भारतातील आदिवासी जमातीचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान ................................ १९
डॉ. आजिनाथ नानाराव जिवरग

३. आझाद हिंद सेनेत यावल तालुक्याचे योगदान आणि भारतीय स्वातंत्र्याची पहाट ................................ २८
डॉ. अनिल साहेबराव पाटील

४. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचे योगदान................................ ३२
डॉ. छाया भास्कर भोज

५. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत वर्तमानपत्रांचे योगदान................................ ३९
डॉ. चित्रा सुकदेव पाटील

६. ब्रिटिशकालीन खानदेशातील भिल्ल एजन्सीची भूमिका ................ ४४
डॉ. डी. एल. पावरा

७. सविनय कायदेभंग चळवळीत धरणगाव येथील जनसामान्यांचा सहभाग................................ ५१
प्रा. डॉ. दिनेश रामदास महाजन

८. पाचोरा येथील हुतात्मा स्मारकाचा इतिहास ........................ ५६
प्रा. डॉ. जगन्नाथ देवराम गोपाळ

९. राष्ट्रवादी विचारसरणीचे विदर्भातील वृत्तपत्रे (टिळक युग) ............ ६२
डॉ. नामदेव वामनराव ढाले

१०. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे कार्य................................ ६७
डॉ. प्रतिभा दीपक सूर्यवंशी

११. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचे योगदान........................ ७४
प्रा. डॉ. एस. जी. शिंदे

१२. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अमिना तैयबजीचे योगदान ................ ७९
प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा

१३. क्रांतिविरांगणा झलकारीबाई यांचे कार्यकर्तृत्व व योगदान ............. ८४
कु. गायत्री जवाहरलाल तेली, डॉ. मनिषा जगदीशलाल वर्मा

१४. आशाताई वाघमारे यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सहभाग ........... ८८
डॉ. मंजुश्री अप्पासाहेब जाधव

१५. ज्ञानोदय वृत्तपत्रातून १९ व्या शतकात शिक्षणविषयक झालेली जागृती .. ९२
श्री. मधू महारु गुमाडे, प्रा. डॉ. संजय यशवंत गवळी

१६. भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि तत्कालीन भारतीय उद्योजक ........१०२
श्री. दीपक दिनकर किनगे

१७. साने गुरूजी यांचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील योगदान ..............१०९
रामकृष्ण नानागीर बावा

१८. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी
सर्व सामान्यांचा सहभाग ......................................११६
श्री. सुनील अरुण नाईक

१९. असहकार चळवळीत अहमदनगर जिल्ह्याचा सहभाग .................१२०
प्रा. डॉ. भानुदास रामदास महाजन

२०. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ऑगस्ट क्रांती .........................१२५
प्रा. डॉ. के. सी. केंद्रे

२१. आदिवासींचे भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान
एक – ऐतिहासिक अवलोकन ....................................१३०
प्रा. डॉ. एन. डी. नाईक

२२. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात जानकीबाई आपटे यांचे
योगदान एक ऐतिहासिक अवलोकन ...............................१३६
डॉ. राधाकृष्ण जोशी

२३. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात खानदेशातील
क्रांतिकारी चळवळी ...................................................१४०
प्रा. इंदिरा अशोक लोखंडे

२४. ब्रिटिश दडपशाहीच्या विरोधात 'इ.स.१९४२ च्या चलेजाव चळवळीत'
जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी घेतलेला सहभाग ...........१४८
मनोहर रूपचंद शिंदे, प्रा. डॉ. धनंजय रमाकांत चौधरी

२५. हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील एक रत्न : हुतात्मा जयवंतराव पाटील ......१५४
विकास यशवंत कांबळे

२६. चाळीसगाव तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक
श्री. शिवाजी विठ्ठल मराठे यांची मुलाखत ............................१६०
श्री. विशाल धर्मराज पवार, प्रा. डॉ. जगन्नाथ देवराम गोपाळ

२७. श्री. म. माटे यांच्या कथा : एक आकलन ............................१६५
डॉ. भूषण ज्ञानदेव पाटील

२८. भारतीय स्वातंत्र्य चळवळीस अनुकूल पोवाडे ........................१७२
डॉ. अर्चना काटकर

२९. भारतीय स्वातंत्र्य चळवळीस अनुकूल काही निवडक
कवींचे प्रसिध्द समरगीते ................................................१७८
प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे)

३०. सुभद्राकुमारी चौहान की कविताओं में राष्ट्रीय चेतना के स्वर..........१८९
डॉ. रोहिदास धोंडीबा गवारे

३१. स्वतंत्रता सेनानी माखनलाल चतुर्वेदी का
हिन्दी साहित्य में योगदान ................................................१९५
प्रा. डॉ. सविता पुंडलिक चौधरी

३२. **Women's Role of In India Freedom Movement** ..............१९९
Mr. Prashant Vasant Ransure

३३. **Colonial Suppression: A Case of Pleaders' Prosecution by the Thana Court**........................................२०७
Dr. Krishna Shivram Gaikwad

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि तत्कालीन भारतीय उद्योजक

**श्री. दीपक दिनकर किनगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहासविभाग
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

इ. स. १६०० मध्ये इंग्रज व्यापारी म्हणून भारतात आले. त्यांच्या इस्ट इंडिया कंपनीने सुमारे दीडशे वर्ष भारतात केवळ व्यापार केला. मात्र १७५० नंतर भारतात निर्माण झालेल्या राजकीय पोकळीचा फायदा घेऊन बंगाल प्रांतात आपली सत्ता स्थापन केली. आणि १८५६ पर्यंत नियोजनबध्द पद्धतीने भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार घडविला. भारत देश हा ब्रिटिश साम्राज्याचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गुलाम झाला होता. त्याविरोधात भारतात अनेक बंड-उठाव झालेत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात राष्ट्रवादाचा उदय होऊन भारतीय स्वातंत्र्य चळवळ प्रारंभ झाली. त्यात सर्वसामान्य जनता, शेतकरी, कामगार, आदिवासी आणि उद्योजक अशा सर्व घटकांचा समावेश होता.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील उद्योजकांच्या योगदानाविषयी अभ्यास करण्यात आला आहे. जमशेदजी टाटा, शेठ वालचंद हिराचंद दोशी, जमनालाल बजाज, घनश्यामदास बिर्ला, रामकृष्ण दालमिया, कस्तुरभाई लालभाई, विओ चिदंबरम पिल्लई इत्यादी निवडक उद्योजकांचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, विश्वकोश आणि वर्तमानपत्र या दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आला आहे.

टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा (१८३९-१९०४) हे भारतीय उद्योजकतेचे जनक मानले जातात. त्यांचे अनेक राष्ट्रवादी आणि क्रांतिकारी नेत्यांची जवळचे संबंध होते. दादाभाई नवरोजी आणि फिरोजशहा मेहता यांचा त्यात समावेश आहे. एवढेच नव्हे तर १८८५ मध्ये झालेल्या काँग्रेसच्या पहिल्या बैठकीत देखील जमशेदजी टाटा सहभागी झाले होते. सुरुवातीच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला आर्थिक निधीसाठी त्यांनी हातभार लावला. जग प्रसिद्ध इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि ताजमहाल हॉटेल हे त्यांच्या राष्ट्रवादी विचाराचे फलित आहे.

१९ व्या शतकात भारतीयांना युरोपियांच्या उत्कृष्ट हॉटेलमध्ये जाण्यास मनाई होती. ताजमहाल हॉटेल त्या साम्राज्यवादी अपमानास्पद वागणुकीला चोख प्रतिउत्तर होते. सप्टेंबर १९९८ मध्ये जमशेदजी टाटा यांनी विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली. त्यासाठी ३० लाख रुपयांची देणगी दिली. ही रक्कम टाटांच्या पूर्ण

संपत्तीचा अर्धा भाग होता. लॉर्ड कर्झन याच्या आक्षेपामुळे हा प्रस्ताव लंडनला गेला आणि तेथील रॉयल सोसायटीने प्राध्यापक विल्यम रामसे यांना भारतात पाठवले. रामसे यांनी बंगळूर मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या स्थापनेला हिरवा कंदील दाखवला. लॉर्ड कर्झनने तेव्हाचे सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड हॅमिल्टन यांना पत्र लिहून टाटांच्या महत्त्वाकांक्षेमुळे ब्रिटिश साम्राज्याला धोका असल्याचे सांगितले. शेवटी कर्झनने मान्यता दिल्यानंतर १९०५ मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या स्थापनेसाठी सुरुवात झाली. राजकीय स्वातंत्र्यांबरोबरच औद्योगिक स्वातंत्र्य देखील गरजेचे असल्याचे जमशेदजी टाटा यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी बिहारच्या सिंगभूमीत आशियाचा पहिला स्टील प्लांट सुरू केला. हाच प्लांट आज जमशेदपूर या नावाने ओळखला जातो.[१] जमशेदजी टाटा हे भारतीय उद्योजकांमधील पहिले उद्योजक होते ज्यांनी ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वास विरोध करून भारतीय राष्ट्रीय चळवळीला हातभार लावला होता.

१९ व्या शतकापर्यंत सागरी वाहतुकीवर ब्रिटिश कंपन्यांनी कब्जा केला होता. शेठ वालचंद हिराचंद दोशी (१८८२-१९५३) यांच्या उद्योगातील विशेष घटनाचे उद्घाटन ब्रिटिशांच्या नव्हे. तर भारतीय राष्ट्रीय नेत्यांच्या हस्ते झाले. एस. एस. लायल्टी जहाज प्रथमतः सागरी सफरीवर निघाले, तेव्हा महात्मा गांधीनी आशीर्वाद दिले होते.[२] १९१९ मध्ये शेठ वालचंद यांनी शिपिंग कंपनी सुरू केली. जहाजाचा पहिला प्रवास लंडनचा असावा, अशी शेठ वालचंद यांची इच्छा होती. त्यानुसार ०५ एप्रिल १९१९ रोजी एस. एस. लायल्टी नावाचे जहाज भारतावरून इंग्लंडसाठी निघाले. या ऐतिहासिक प्रवासात शेठ वालचंद यांच्या व्यतिरिक्त काश्मीरचे महाराजा हरी सिंह, कपूरथलाचे महाराज जगतजीत सिंह, क्रिकेटर प्रिन्स दिलीप सिंह असे अनेक प्रसिद्ध लोक उपस्थित होते. हा ऐतिहासिक दिवस आता देशात राष्ट्रीय समुद्र दिवस म्हणून साजरा केला जातो. वालचंद दोशी यांनी देशाचा पहिला शिपिंग कारखाना, पहिला एअरक्राफ्ट कारखाना आणि पहिला आधुनिक कार कारखान्याची पायाभरणी केली, म्हणूनच त्यांना आधुनिक भारतीय वाहतुकीचे जनक म्हटले जाते, शेठ वालचंद यांनी स्वातंत्र्याच्या लढाईत काँग्रेस आणि महात्मा गांधी यांची साथ दिली होती. १९३० मध्ये तत्कालीन बॉम्बेच्या व्यापारी संघटनांनी वालचंद दोशींच्या अध्यक्षतेत महात्मा गांधींच्या सुटकेचा प्रस्ताव मंजूर केला होता. वालचंद दोशी यांनी भारतातील पहिली राष्ट्रीय वृत्त संस्था फ्री प्रेस ऑफ इंडिया उघडण्यासही हातभार लावला होता.[३] बिटिश सरकारच्या विरोधाला न जुमानता वालचंद दोशी यांनी नौकानयन, नौका बांधणी, विमान बांधणी आणि मोटार निर्मिती क्षेत्रात मनाचे स्थान प्राप्त केले. ते नेहमी म्हणत असत, 'हिंदुस्थानात जहाजे, विमाने आणि मोटारी यांची निर्मिती होत आहे हे

पाहिल्याशिवाय मला मृत्यू येणार नाही.'[४] त्यांचे हे स्वप्न त्यांनी अथक परिश्रम करून सत्यात उतरविले. वालचंद हिराचंद दोशी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशी उद्योगधंदे स्थापन करून भारताच्या औद्योगिक विकासात मोठे योगदान दिले त्याचबरोबर राष्ट्रीय चळवळीलाही हातभार लावला.

**जमनालाल बजाज** (१८८९-१९४२) हे एक गांधीवादी देशभक्त व बजाज उद्योगसमूहाचे प्रवर्तक. तरूणपणीच जमनालाल बजाज यांना लोकमान्य टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, रवींद्रनाथ टागोर इ. थोर व्यक्तींचा सहवास लाभला. लोकमान्यांचा केसरी ते लहानपणापासून वाचीत. १९१५ मध्ये म. गांधीजी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावरून परत आल्यावर बजाज त्यांना भेटले. ते महात्माजींच्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले आणि आपणास 'पाचवा मुलगा' म्हणून स्वीकारावे, अशी त्यांनी गांधीजींना विनंती केली. (१९२०) ...... जमनालाल नागपूर येथील अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष झाले (१९२०). काँग्रेसचे खजिनदार म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. १९२० मध्ये त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली आणि काँग्रेसच्या ठरावानुसार रायबहादूर या उपाधीचा त्याग केला. १९२३ मध्ये त्यांनी नागपूर येथे राष्ट्रध्वज सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्यांना १८ महिन्यांची शिक्षा झाली. त्याच वर्षी गांधीजीचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी 'गांधी सेवकसंघा'ची त्यांनी स्थापना केली. १९२४ मध्ये ते नागपूर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व १९२५ मध्ये चरखा संघाचे खजिनदार होते. त्यांनी समाजसेवेसाठी अनेक संस्था स्थापन केल्या आणि अस्पृश्यतानिवारण, गोवर्धन, शिक्षणसंस्था यासाठी भरीव आर्थिक मदत केली. ...... काँग्रेसच्या अस्पृश्यतानिवारण मोहिमेत त्यांनी सचिव या नात्याने पुढाकार घेऊन अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रचार केला. आणि वर्ध्याचे स्वतःच्या मालकीचे लक्ष्मीनारायण मंदिर हरिजनांना खुले केले (१९२८). विलेपार्ले (मुंबई) येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते (१९३०). या प्रसंगी त्यांच्या पत्नी जानकीदेवी व मुलगा कमलनयन यांनाही शिक्षा झाल्या. जमनालाल यांनी वर्ध्याजवळील 'शेगाव' हे खेडे व तेथील जमीन गांधीना दिली. तेथे गांधीनी 'सेवाग्राम आश्रम' स्थापन केला (१९३६). जयपूरच्या संस्थानी प्रजेस राजकीय हक्क मिळावेत, म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना पुन्हा १९३९ मध्ये शिक्षा झाली. दुसऱ्या महायुध्दाकाळात युध्दविरोधी प्रचारांमुळे त्यांना अटक झाली (१९४१).[५] जमनालाल बजाज यांनी महात्मा गांधीजीं सोबत राष्ट्रीय चळवळीतील अनेक लढ्यांमध्ये सहभाग घेतला. राजकारणाबरोबरच अस्पृश्यता निवारण, गोवर्धन, शिक्षण संस्था अशा सामाजिक

कार्यातही त्यांनी सहभाग घेतला. त्यांच्या देशसेवेच्या कार्यात त्यांच्या पत्नी आणि मुलाचाही सहभाग होता. परिणामी त्यांच्या संपूर्ण कुटुंबालाच स्वातंत्र्य चळवळीत शिक्षा भोगावी लागली होती.

स्वातंत्र्याच्या लढ्यात योगदान देणाऱ्या उद्योगपतींमध्ये घनश्यामदास बिर्ला (१८९४-१९८३) हे प्रमुख उद्योजक आहेत. इतिहासकार एलन रॉस आपले पुस्तक 'द इमिसरी जी. डी. बिर्ला, गांधी अँड इंडिपेंडेंस' मध्ये लिहितात १९१६ मध्ये जीडींच्या एका मित्राने बंदूक आणि काडतुसांचे दोन क्रेट चोरले होते. क्रांतिकारकांना शस्त्रे वितरित करण्यापूर्वीच त्याची कुणकुण पोलिसांना लागली होती. त्यामुळे शस्त्रे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आली. या दरम्यान जीडींच्या घरीही शस्त्रे ठेवण्यात आली होती. पोलिसांनी संशयावरून कारवाई सुरू केली. मात्र छापा पडण्याआधीच जीडी उटीला निघून गेले होते. तिथे ते भूमिगत झाले. काही आठवडे त्यांनी साधूच्या वेशात पुष्करमध्ये घालवले.[६] काडतूस प्रकरणानंतर राजकीय क्रांतिकारकांचा आणि बिर्ला यांचा संबंध असल्याचा संशय इंग्रजांना वारंवार येत होता. परंतु 'मला दहशतवादाची फारशी आवड नव्हतीच आणि महात्मा गांधींची संबंध आल्यावर जी काही उरलीसुरली आवड होती ती पण विरून गेली,' असं त्यांनी लिहून ठेवल आहे.[७]

१९१६ मध्येच जीडी पहिल्यांदा महात्मा गांधीजींना भेटले आणि या भेटी कायम होत राहिल्या. जीडींना पाठवलेल्या एका पत्रात महात्मा गांधीजी लिहितात, 'खादी, अस्पृश्यता आणि शिक्षणासाठी मला दोन लाख रुपये पाहिजे आहेत. डेअरी साठी ५० हजार रुपयांची गरज आहे, असा आश्रमाचा खर्च येतो. तुम्ही जास्तीत जास्त मदत करा.' या पत्राला जीडींनी उत्तर देताना म्हटले, '५० हजार ते एक लाख रुपये देण्यास मी सक्षम आहे. पैशामुळे एखादे काम थांबले असेल, तर त्यासाठी मला तुम्ही कधीही पत्र पाठवू शकता.'[८] यावरून ते स्वातंत्र्य चळवळींला आणि महात्मा गांधींच्या विधायक कार्यास आर्थिक मदत करण्यास तयार असत.

बाळ गंगाधर टिळक यांच्या भाषणाने घनश्यामदास बिर्ला फार प्रभावित झाले होते. १९१६ च्या दरम्यान बिर्ला आणि त्यांचे मित्र गांगुली यांनी टिळकांच्या भेटीनंतर स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला.[९] महात्मा गांधींना भेटण्याआधीच घनश्यामदास बिर्ला हे राष्ट्रवादी अर्थतज्ज्ञ बनले होते. गांधीजींच्या संपर्कात आल्यावर त्यांच्या स्वातंत्र्य स्वातंत्र्याच्या चळवळीबद्दलच आकर्षण वाढलं. चलेजाव चळवळीचा ठराव मंजूर करण्याचा निर्णय १९४२ मध्ये मुंबई येथील बिर्ला हाऊसमध्ये घेण्यात आला होता. दुर्गाप्रसाद मंडलिया यांनी म्हटले की, 'ब्रिटिश राजवटीत बिर्लांची आपल्यामुळे पंचायत होऊ नये म्हणून गांधीजींनी

मुंबईतील आपला मुक्काम बिर्लांच्या घरातून काँग्रेस कार्यालयात हलवायचं ठरवलं. जेव्हा रामेश्वरदासजी व घनश्यामदासजींना याची कुणकुण लागली तेव्हा त्यांना धक्काच बसला. अवमानित झाल्यासारखं वाटलं. ब्रिटिशांचा रोष आम्हाला सहन करावा लागेल म्हणून तुम्ही जर काँग्रेस कार्यालयात मुक्काम हलवला तर ते कृत्य आमच्यावर अन्याय करणार होईल.' असं दोघांनी गांधीजींना नम्रपणे सांगितलं.[१०] घनश्यामदास बिर्ला यांनी प्रारंभी क्रांतिकारक यांना मदत केली. त्यानंतर ते महात्मा गांधींच्या विधायक कार्यात सहभागी झाले. १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांनी महात्मा गांधींना सहाय्य केले. ब्रिटिश सरकारच्या विरोधाची त्यांनी तमा बाळगली नाही, यावरून त्यांचे देशप्रेम व देशभक्तीचा परिचय येतो.

**रामकृष्ण दालमिया** (१८९३-१९७८) यांचा स्वातंत्र्यआधीच्या देशातील अव्वल उद्योगपतींमध्ये समावेश होता. रामकृष्ण दालमिया यांची मुलगी नीलिमा दालमिया आधार यांनी त्यांचे पुस्तक 'फादर डीअरेस्ट द लाईफ अँड टाइम्स ऑफ आर के दालमिया' यामध्ये लिहिले आहे, की महात्मा गांधीजींचे सविनय कायदेभंग आंदोलन १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहांसोबत सुरू झाले. त्यावेळी रामकृष्ण दालमिया यांनी या आंदोलनासाठी गुप्त देणगी दिली होती. त्यांच्या औद्योगिक साम्राज्यात वृत्तपत्र, बँक, विमा कंपनी, विमानसेवा, सिमेंट कापड आणि खाद्यपदार्थांचा समावेश होता. इंग्रजी राजवटीला वाटायची की, दालमिया आपल्या उद्योगाचा वापर सरकार विरोधातील आंदोलनाला चालना देण्यासाठी करतात. विशेषतः दालमियांचे वृत्तपत्र आणि कापड कारखान्यांकडे इंग्रज नेहमीच संशयी वृत्तीने बघत. फ्रान्सचे पत्रकार अंगलियो रिनाल्ड यांनी १९३८ मध्ये दालमियांच्या वृत्तपत्र व्यवसायाची दखल घेत लिहिले की, भारतीय राजवटीला वृत्तपत्रांच्या माध्यमातून आव्हान दिले जात आहे.[११]

**कस्तुरभाई लालभाई** (१८९४-१९८०) हे केवळ व्यापार व उद्योगाचे शिल्पकार नव्हे, तर देशाच्या शिल्पकारांपैकी एक होते. १९२१ च्या काँग्रेस अधिवेशनानंतर त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनांमध्ये उघडपणे सहभाग घेण्यास प्रारंभ केला. सोबतच काँग्रेसच्या आंदोलनासाठी आर्थिक योगदान दिले. अहमदाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष असतांना सरदार पटेल यांच्या सांगण्यावरून कस्तुरभाईंच्या कुटुंबाने प्राथमिक शिक्षणासाठी पन्नास हजार रुपये देणगी दिली होती. १९३० पासून कस्तुरभाई स्वदेशी आंदोलनाशी जोडले गेले होते. आधी ते कोट, पॅन्ट, हॅट असे कपडे परिधान करीत. मात्र महात्मा गांधीजींना भेटल्यानंतर त्यांनी खादीचे पोशाख परिधान करण्यास प्रारंभ केला. कस्तुरभाई यांचे महात्मा गांधीची व्यतिरिक्त सरदार पटेल, दादा मावळणकर, दिवाण जीवनलाल आणि मोतीलाल नेहरू यासारख्या

मोठ्या नेत्यांशीही चांगले संबंध होते. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि इतर मोठ्या नेत्यांना अटक करण्यात आली. ही बातमी पसरताच नेत्यांच्या सुटकेसाठी देशभरात संप-आंदोलने सुरू झाली. मुंबई आणि अहमदाबादच्या टेक्स्टाईल मिलने देखील कारखाने बंद केले. यात अहमदाबाद येथील टेक्स्टाईल किंग कस्तुरभाई लालभाई यांचे मोठे योगदान आहे.[१२] १९४२ मध्ये जयप्रकाश नारायण, अरुणा असफ आली यांच्यासारख्या समाजवादी नेतृत्वाखाली भूमिगत चळवळ सुरु झाली. कस्तुरभाई यांनी भूमिगत चळवळीच्या नेत्यांना त्यांच्या गुप्त कार्यात मदत केली.[१३] कस्तुरभाई लालभाई यांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनांमध्ये आणि आंदोलनांमध्ये सहभाग घेतला होता. त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय चळवळीसाठी आर्थिक योगदानही दिले होते. तर भूमिगत चळवळीचे नेत्यांना मदत केली होती. महात्मा गांधीच्या प्रभावाने त्यांनी खादीचा पोशाख धारण केला होता.

**वि. ओ. चिदंबरम पिल्लई** (१८७२-१९३६) यांनी आपल्या व्यवसायाला स्वातंत्र्यलढ्याचे शस्त्र बनविले होते. ते काँग्रेस नेते सुद्धा राहिले होते. त्यांनी ब्रिटिश इंडियन स्टीम नेव्हिगेशन कंपनीचा एकाधिकार संपविण्यासाठी १९०६ मध्ये स्वदेशी स्टीम नेविगेशन कंपनी स्थापन केली. तुतीकोरीन आणि कोलंबोच्यामध्ये पहिली स्वदेशी भारतीय शिपिंग सेवा त्यांच्या प्रयत्नांनी सुरू झाली. आणि ब्रिटिश जहाजांना या कंपनीने स्पर्धा दिली. त्याचा परिणाम म्हणून घाबरलेल्या ब्रिटिश इंडियन स्टीम नेव्हिगेशन कंपनीने प्रति व्यक्तीमागे एका रुपयाने भाडे कमी केले. प्रतिउत्तर म्हणून स्वदेशी कंपनीने सुद्धा भाड्याचे दर कमी केले. स्पर्धा इतकी वाढली की स्वदेशी स्टीम नेवीगेशन कंपनीला नष्ट करण्यासाठी इंग्रज कंपनीने प्रवासांना मोफत सेवेसह छत्र्या देणे, चिदंबरम पिल्लई यांच्यावर दबाव आणणे असे प्रयत्न केले. पण त्यांना अपयश आले. ब्रिटिश व्यापाऱ्यांना आणि सत्तेच्या विरोधानंतरही स्वदेशी कंपनीची शिपिंग सेवा लोकप्रिय झाली. दरम्यानच्याच काळात पिल्लई राजकारणातही सक्रिय राहिले. १९०८ मध्ये बंगालचे जहाल नेते बिपिन चंद्रपाल तुरुंगातून सुटल्यामुळे त्याचा आनंद उत्सव साजरा केला जात होता. त्यात पिल्लई यांचे भाषण ऐकून इंग्रज अधिकारी विंच याने त्यांना तिरुनेलवेली येथे बोलाविले आणि आंदोलनात सहभाग न घेण्याची आदेश दिले. मात्र पिल्लई यांनी इंग्रज अधिकाऱ्याचे आदेश मानले नाही.[१४] त्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले इंग्रजांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. या खटल्यात त्यांना जन्मठेपेच्या दोन शिक्षा सुनावण्यात आल्या. परंतु इ. स. १९१२ मध्ये त्यांची सुटका करण्यात आली होती.[१५] चिदंबरम पिल्लई यांनीही आपल्या उद्योगाच्या माध्यमातून ब्रिटीश सत्तेला केलेला विरोध त्यांच्या

देशप्रेमाचा परिचय देते.

**समारोप आणि निष्कर्ष :**

वरील सर्व उद्योजकांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, या व्यक्तींनी स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात मोठी भर घातली. त्यांचा स्वतःचा आर्थिक फायदा मोठ्या प्रमाणात झाला असला, तरी भारतात स्वदेशी उद्योगधंदे उभारण्यात आणि रोजगार निर्मितीत त्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय चळवळीत दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण ठरते. ही सर्व मंडळी स्वदेशी, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय नेत्यांनी प्रभावित झालेली होती. आणि म्हणूनच त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला असावा असे वाटते. अनेकांनी राष्ट्रीय चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला तर अनेकांनी राष्ट्रीय चळवळीच्या यशस्वीतेसाठी आर्थिक योगदान दिले. काहींनी स्वदेशीचा पुरस्कार करून खादीचा पोशाख धारण केला तर राष्ट्रीय चळवळीत सक्रिय सहभाग घेतल्यामुळे काही उद्योजकांना व त्यांच्या कुटुंबियांना तुरुंगवास भोगावा लागला. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. तसेच स्वातंत्र्यानंतर झालेल्या भारताच्या आर्थिक विकासाचे मूळ या उद्योजकांच्या योगदानात असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. ०५ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
२. गीता पिरामल, बिझनेस लिजेंडस, अनुवाद- अशोक जैन, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती, पुनर्मुद्रण, ऑक्टोबर २०१६, पा. क्र. २४४-४५
३. ०६ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
४. झेंडे जयप्रकाश, स्वप्न उद्योजकांचे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००८, पा. क्र. १४४-४५
५. https://vishwakosh. marathi. gov. in/27931/
६. ०२ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
७. गीता पिरामल, बिझनेस लिजेंडस, उपरोक्त पा. क्र. २२
८. ०२ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
९. गीता पिरामल, बिझनेस लिजेंडस, उपरोक्त पा. क्र. २१
१०. गीता पिरामल, बिझनेस लिजेंडस, उपरोक्त पा. क्र. १०
११. १० ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
१२. ११ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
१३. गीता पिरामल, बिझनेस लिजेंडस, उपरोक्त पा. क्र. २६१
१४. १३ ऑगस्ट २०२२, दैनिक दिव्य मराठी, जळगाव
१५. https://en. wikipedia. org/wiki/V. O. Chidambaram Pillai